**<u>ठळक बातम्या</u>**

- जीएसटी कर सुधारणांचं विविध मान्यवरांकडून स्वागत/ उद्योग जगताने व्यक्त केला आनंद
- कोळशाच्या व्यवहारासाठी शेअर बाजाराच्या धर्तीवर वेगळा मंच सुरू होणार
- जेएनपीटीच्या टर्मिनल-टूचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वाँग यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीने उद्घाटन
- आशिया चषक हॉकी स्पर्धेच्या सुपर फोर सामन्यात भारतानं कोरियाला २-२ असं बरोबरीत रोखलं

**आणि**

- नागपूर-अमरावती मार्गावर सोलर एक्सप्लोझिव्ह कंपनीत झालेल्या स्फोटात एकाचा मृत्यू, १६ जखमी

**<><><><>**

जीएसटी कररचनेतल्या सुधारणांचं सर्व क्षेत्रातून स्वागत होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या सुधारणांचं कौतुक केलं आहे. जीएसटीचे दर कमी करण्याच्या सरकारच्या या निर्णयामुळे सर्वांना फायदेशीर होणार आहे. जीवनमान सुलभ करण्यासाठी दरांचं सुसूत्रीकरण आणि सुधारणांसाठी एक सविस्तर प्रस्तावही तयार केल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे.

**परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर** यांनी जीएसटीमधला बदल जीवन सुलभ आणि व्यवसाय सुलभ करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांवर मोठा प्रभाव टाकेल. अशी प्रतिक्रिया आपल्या समाज माध्यमावर दिली आहे. तर जीएसटीमधली सुधारणा ही एक परिवर्तनकारी पाऊल असून शेतकरी, एमएसएमई, महिला, तरुण, मध्यमवर्गीय या सर्वांनाच दिलासादायक असल्याची प्रतिक्रिया केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री **नितीन गडकरी** यांनी दिली आहे.

जीएसटी सुधारणांमध्ये कर्करोग आणि दुर्मीळ आजारांच्या उपचारांसह ३६ जीवनरक्षक औषधांवरचा जीएसटी शून्य टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. त्यामुळे

सर्वसामान्यांचा आरोग्यसेवेवरचा खर्च कमी होईल आणि जीवनमान सुधारेल, अशी प्रतिक्रिया केंद्रीय आरोग्य मंत्री **जे. पी. नड्डा** यांनी दिली आहे. जीएसटी कररचनेतल्या सुधारणेमुळे देशातल्या प्रत्येक कुटुंबाला मदत होणार असल्याची प्रतिक्रिया माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली....

- **- -होल्ड- बाईट- वैष्णव**. - - -

जीएसटी सुधारणांमुळे सर्वसामान्यांना दिलासा, महागाईवर नियंत्रण आणि लहान उद्योगांना मजबुती असे अनेक उद्देश साध्य झाले आहेत, अशी प्रतिक्रिया केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री **रामदास आठवले** यांनी दिली आहे. जीएसटीमध्ये केलेल्या सुधारणांचं माजी केंद्रीय अर्थमंत्री **पी. चिदंबरम** यांनी स्वागत केलं आहे. जीएसटीमधल्या सुधारणा या आधीपासूनच लागू व्हायला हव्या होत्या, अशी प्रतिक्रिया चिदंबरम यांनी मदुराई इथे माध्यमांशी बोलताना दिली.

काँग्रेस पक्ष दीर्घकाळपासून या सुसूत्रीकरणाची मागणी करत होता, असं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

उद्योग आणि व्यवसाय जगताने या सुधारणांचं स्वागत केलं आहे. जीएसटी सुधारणेतल्या कर्जाची परतफेड आणि एमएसएमईवरचे अनुक्रमे ५ टक्के आणि १८ टक्के करांमुळे व्यवसाय प्रक्रिया सुलभ होईल, अशी प्रतिक्रिया भारतीय उद्योग महासंघ सीआयआयने दिली आहे. तर जीएसटी सुधारणा अप्रत्यक्ष कर रचना परिपक्व झाल्याचं दर्शवतात अशी प्रतिक्रिया फिक्की अर्थात फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीने दिली आहे. असोचेम चे मनीष सिंगल यांनी सांगितलं...

- **- होल्ड- बाईट- सिंगल** - -

या सुधारणा म्हणजे करव्यवस्थेतलं एक धाडसी पाऊल असून यामुळे मागणीला चालना मिळेल, तसंच संबंधित प्रक्रिया सोप्या करतील, अशी प्रतिक्रिया फिक्कीचे माजी अध्यक्ष शुभ्रकांत पांडा यांनी दिली आहे. लहान व्यापारी, ग्राहकांसह भारताच्या अर्थव्यवस्थेलाही फायदा होणार असल्याचं ऑल इंडिया ट्रेडर्स कॉन्फेडरेशने म्हटलं असून त्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत. इंडियन मर्चंट्स चेंबरने या सुधारणांचं स्वागत केलं आहे.

सर्वसामान्यांनी या फेरबदलांबद्दल समाधान व्यक्त केलं आहे. ऐकूया एका गृहिणीची प्रातिनिधीक प्रतिक्रीया..

**- - होल्ड- बाईट- पवार - -**

**- <><><><>**

वस्तू आणि सेवा कररचनेच्या सुसूत्रीकरणाला काल वस्तू आणि सेवा कर परिषदेच्या ५६व्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यापुढे फक्त ५ आणि १८ टक्के अशी दोन स्तरात जी एसटी कर आकारणी होईल असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी वार्ताहर परिषदेत सांगितलं. ही सुधारणा २२ सप्टेंबरपासून लागू केली जाईल.

**<><><><>**

शेअर बाजाराच्या धर्तीवर कोळशाच्या व्यवहारासाठी वेगळा मंच सुरू होणार असल्याची माहिती केंद्रीय कोळसा मंत्री जी. किशन रेड्डी यांनी आज मुंबईत दिली. कोळसा मंत्रालयाच्या स्टार रेटिंग पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते.या मंचाच्या स्थापनेला संसदेची मान्यता मिळाली असल्याचं त्यांनी सांगितलं. या मंचाच्या माध्यमातून देशातल्या खरेदीदारांच्या गरजा पूर्ण केल्या जातील असं ते म्हणाले. गेल्या काही वर्षात कोळसा क्षेत्रात सातत्याने सुधारणा होत आहेत. कोळसा खाणींच्या लिलावातून खासगी क्षेत्रातल्या अधिकाधिक कंपन्या या क्षेत्रात येत आहेत. कोळसा उत्खननातील खासगी क्षेत्राची हिस्सेदारी ५० टक्के पर्यंत वाढावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. येत्या काळात कोळशाची मागणी वाढणार असल्याने कोळसा क्षेत्रातल्या कंपन्यांनी नवनवतीन तंत्रज्ञान विकसित करावे. त्याचवेळी विविध घटकांना ध्यानात घेऊन काळजीपूर्वक खाणकाम करावं असं आवाहन रेड्डी यांनी केलं. यावेळी कोळसा आणि खाणकाम क्षेत्रातल्या विविध कंपन्यांना आणि संस्थांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. कोळसा नियंत्रकांच्या नव्या वेबसाईटचे अनावरण सुद्धा त्यांनी केले.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वाँग यांनी आज जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्टच्या टर्मिनल २ चं दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घघाटन केलं. यावेळी केंद्रीय बंदरे, शिपींग आणि जलवाहतूक मंत्री सर्बानंद सोनो◌ेवाल, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, बंदरे व शिपींग चे राज्यमंत्री शांतनू ठाकूर उपस्थित होते. ही गोदी पूर्णपणे

सौरऊर्जेवर चालणारी असून विशेष मार्गिका असलेलं या पोर्टवरील पहिलं कंटेनर टर्मिनल आहे.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वाँग यांच्याबरोबर शिष्टमंडळ स्तरावर चर्चा केली. यावेळी परस्पर सहकार्यांच्या विविध पर्यायांवर चर्चा झाली. दोन्ही देशातल्या समान  प्राधान्यांचे विषयही चर्चेत होते. आज सकाळी परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ.एस. जयशंकर यांनी सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेंस वाँग यांच्या बरोबर चर्चा केली. दोन्ही देशाच्या प्रधानमंत्र्यांच्या चर्चेत परस्पर सहकार्याची नवी वाट निर्माण होईल असं त्यांनी म्हटलं आहे. सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वाँग हे तीन दिवसाच्या भारत दौऱ्यावर असून त्यांचा हा दौरा भारत सिंगापूर यांच्यातल्या  संबंधाना ६० वर्ष पूर्ण होत असल्याबद्दल होत आहे.

<><><><>

भाद्रपद शुद्ध चतुर्थीला सुरु झालेल्या गणेशोत्सवाचा आज आठवा दिवस आहे. आणखी दोन दिवसांनी येत्या शनिवारी लाडक्या गणरायाला पुढच्या वर्षी लौकर या असं सांगत निरोप दिला जाईल.

गणेश विसर्जनाच्या निमित्तानं गर्दीची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनानं तयारी केली आहे.

ईद ए मिलाद उद्या असून त्यानिमित्तची शोभायात्रा येत्या सोमवारी काढण्याचा निर्णय मुस्लिम समाजानं घेतला आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई शहर आणि उपनगर जिल्ह्यांमधे ईद ए मिलादची सार्वजनिक सुट्टी उद्याऐवजी येत्या सोमवारी देण्यात येणार आहे. या जिल्ह्यांमधे शासकीय आणि निमशासकीय कार्यालयं उद्या सुरु राहतील. मात्र हा बदल राज्यातल्या इतर जिल्ह्यांना लागू राहणार नाही असं शासनानं कळवलं आहे.

<><><><>

बिहारमधल्या राजगीर इथं सुरु असलेल्या हॉकी आशिया कप २०२५ च्या सुपर ४ सामन्यात भारतानं कोरियाला २-२ असं बरोबरीत रोखलं. हार्दिक सिंगनं भारताला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर यांग जिहुन आणि ह्योनहोंग किम यांनी कोरियासाठी सलग दोन गोल केले. मनदीप सिंग यांनी शेवटच्या क्वार्टरमध्ये भारताला एक गुण मिळवून देत बरोबरी

साधली. भारतीय हॉकी संघ साखळी सामन्यांमध्ये अपराजित राहिला आहे. हरमनप्रीतच्या नेतृत्वाखालील संघाने चीनचा ४-३, जपानचा ३-२ आणि कझाकस्तानचा १५-० असा पराभव केला.

**<><><><>**

नागपूर अमरावती मार्गावर सोलर एक्सप्लोझिव्ह कंपनीमध्ये मोठा स्फोट झाला असून त्यात १ जण ठार तर १६ जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी चार जणांची प्रकृती गंभीर आहे. काल मध्यरात्री साडे बाराच्या सुमाराला हा स्फोट झाला. जखमींना नागपूरमधल्या एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**//<><><><>//**